# मुंबई विद्यापीठ

क्र. आरइजी/आयसीसी/२०२३-२४/७

## परिपत्रक

**विषय : अभियांत्रिकी विद्याशाखेच्या उन्हाळी परीक्षा २०२३ मध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये विशेष प्रवेश संधी देण्याबाबत.**

महोदय/महोदया,

विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे संचालक, प्रभारी संचालक, स्कुल ऑफ अप्लाईड सायन्स ॲन्ड इंजिनियरीग, कल्याण उपपरीसर, कल्याण यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, प्रचलित अध्यादेश O.6243, O.6244 नुसार प्रथम वर्षात अनुत्तीर्ण विद्यार्थी तृतीय वर्षात प्रवेश घेण्यास अपात्र असतात तसेच द्वितीय वर्षात अनुत्तीर्ण विद्यार्थी चतूर्थ वर्षात प्रवेश घेण्यास अपात्र असतात. या अनुषंगाने विद्यापीठ अधिकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उन्हाळी परीक्षा २०२३ अभियांत्रिकी विद्याशाखेतील परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील सत्रात विशेष प्रवेश संधी देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली प्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

१. प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्राकरीता किंवा द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या सातव्या सत्राकरीता तात्पूरता प्रवेश काही अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात यावा व त्याबाबतचे विहित हमीमत्र प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याने महाविद्यालयाकडे सादर करावे.

२. द्वितीय सत्र २०२३ (हिवाळी) सत्रातील परीक्षांमध्ये अनुशेषाचे (backlog) विषय पुर्णत: उत्तीर्ण होऊन जे विद्यार्थी प्रचलीत तृतीय/चतुर्थ वर्षामध्ये प्रवेश घेण्यास पात्र ठरतील अशाच विद्यार्थ्यांचा प्रवेश पुढील सत्रासाठी सुरू ठेवण्यात येईल. मात्र सर्व विद्यार्थ्यांची सत्र ५/७ मधील अध्ययन, अध्यापन, प्रात्यक्षिक, सत्रकर्म, फिल्ड व्हीजीट व इतर बाबी, परीक्षांमधील संपादणूक ग्राहय धरावी. तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्रामध्ये अथवा चतुर्थ सत्राच्या सातव्या सत्रामध्ये तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी जसे अध्ययन, प्रात्यक्षिक, सत्रकर्म, फिल्ड व्हीजीट व इतर बाबी महाविद्यालयाने उपलब्ध वेळेनुसार पुर्ण करून घ्याव्यात.

३. सदर संधीचा लाभ मिळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सत्र ५, ६, ७ व सत्र ८ करीताच्या सत्र समाप्तीच्या लेखी परीक्षा एकत्रित उन्हाळी २०२४ च्या परीक्षांमध्ये घेण्यात येतील.

४. जे तात्पुरते प्रवेशित विद्यार्थी हिवाळी २०२३ मधील परीक्षेमध्ये प्रथम, द्वितीय वर्षाचे अनुशेष (backlog) पूर्ण करू शकणार नाहीत व प्रचलित नियमानुसार तृतीय / चतुर्थ वर्षाच्या पाचव्या / सातव्या सत्राकरीता अपात्र ठरतील अशा विद्यार्थ्यांना दिलेला तात्पुरता प्रवेश हा आपोआप रद्द होईल. त्याकरिता अशा विद्यार्थ्यांना त्यांनी महाविद्यालयाकडे जमा केलेल्या शैक्षणिक शुल्क व इतर बाबी यांचा परतावा देय राहणार नाही.

पुढे ..२

Scanned with CamScanner

५. ही संधी विशेष बाब म्हणून फक्त शैक्षणिक वर्ष २०२३—२४ मधील विद्यार्थ्यांसाठी एकच वेळ लागू असणार आहे, तेसच याचा संदर्भ पूर्वलक्षी प्रभावाने वापरता येणार नाही.

ठिकाण : मुंबई – ४०० ०९८.
दिनांक : १ नोव्हेंबर, २०२३

(डॉ. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१.विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक, स्कुल ऑफ अप्लाईन सायन्स ॲंड इंजिनियरींग कल्याण उपपरिसर, कल्याण, मुंबई विद्यापीठ
२.अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ
३.सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ
४.उपकुलसचिव, नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ
५.स्वीय सहायक १) प्रभारी कुलगुरू २) प्रभारी प्र—कुलगुरू ३) प्रभारी कुलसचिव

Scanned with CamScanner